**दिनांक : २७ ऑगस्ट २०२२**

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**

**विषय : स्वा. सावरकर स्मृती आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेसाठी आपला संघ पाठविण्याबाबत.**

सस्नेह नमस्कार,

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध घटकांसाठी प्रबोधन, प्रशिक्षण तसेच संशोधन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून अनेक उपक्रम योजत असते. वर्तमान सामाजिक, आर्थिक तसेच राष्ट्रीय प्रश्नांवर परिसंवाद, चर्चासत्रे, परिषदांचे तसेच स्पर्धांचे आयोजन करणे हा ही प्रबोधिनीच्या कार्याचाच एक भाग आहे.

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी "स्वा. सावरकर स्मृती आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे" आयोजन दरवर्षी केले जाते. यंदा ही स्पर्धा रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांच्या **संयुक्त विद्यमाने** आयोजित करीत आहोत. या स्पर्धेचे हे १५वे वर्ष असून ही स्पर्धा **रविवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२२** रोजी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ऐतिहासिक वास्तूतील प्रसिद्ध **"ॲम्फी थिएटर"** येथे संपन्न होत आहे.

या वर्षी भारत देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे. याच पार्श्वभूमीवर **"भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहास लेखनात क्रांतिकारकांवर नेहमीच अन्याय होत गेला आहे"** हा प्रस्ताव वादस्पर्धेसाठी निश्चित केला आहे. क्रांतिकारकांचे मुकुटमणी असलेल्या स्वा. सावरकरांनी विद्यार्थी दशेत असतानाच सशस्त्र क्रांतीचे स्फुल्लिंग चेतवण्याचे प्रेरक कार्य, याच महाविद्यालयातून सुरु केले होते. त्यामुळे स्पर्धकांना या पवित्र वास्तूच्या मंचावर आपले सादरीकरण करता येणे, ही एक अविस्मरणीय आणि अभिमानास्पद संधीच !

आपणास विनंती आहे की, **आपल्या महाविद्यालयाच्या** वतीने **एक संघ** या स्पर्धेला पाठवावा. स्पर्धेचे नियम, सूचना आणि अधिक माहितीचे ब्रोशर आणि पोस्टर या पत्रासोबत देत आहोत. स्पर्धेचे पोस्टर आपल्या महाविद्यालयाच्या दर्शनी भागातील सूचनाफलकावर आणि अन्य आवश्यक ठिकाणी लावण्याची, कृपया व्यवस्था करावी. तसेच संबंधित प्राध्यापकांना सर्व विद्यार्थ्यांमध्ये आवाहन करण्यास सूचित करावे.

या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील होमामध्ये ज्या लाखो ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या समिधा अर्पण झाल्या, त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आपल्या महाविद्यालयाच्या सहयोगाने ही स्पर्धा आपण यशस्वी करु शकू, याच अपेक्षेत !

आपली स्नेहांकित,

स्वाती महाळंक,
कार्यकारी प्रमुख, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी,
पुणे कार्यालय,
८८८८१०२२०७ | swatim@rmponweb.org

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने

आज़ादी का अमृत महोत्सव



# स्वा. सावरकर स्मृती
# 'आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा'



## विषय :
## "भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहास लेखनात क्रांतिकारकांवर नेहमीच अन्याय होत गेला आहे"

### रविवार, दि. २५ सप्टेंबर २०२२

**नोंदणी :**

- स्पर्धेस येणाऱ्या स्पर्धकांनी नोंदणी **Online** अर्जाद्वारे करावी
- नोंदणी अंतिम **दि. १७ सप्टेंबर २०२२**

**प्रवेश शुल्क :**

- प्रत्येक संघासाठी, **रु. ५५०/-** शुल्क (वस्तू व सेवाकरासह) आकारण्यात येईल. (चहा, नाश्ता, भोजनासह)
- **UPI ID :** rmplekha@okaxis • **GPay No.** 82917 56929
- शुल्क भरल्यावर **अनिल पांचाळ** मो. क्र. **99754 15922** या नंबरवर कळवावे.

Scan

Registration Link:
iidl.org.in/savarkarspardha/

**पारितोषिक :**

| | |
|---|---|
| प्रथम | रु. ११,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा व प्रमाणपत्र |
| द्वितीय | रु. ७,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा व प्रमाणपत्र |
| तृतीय | रु. ५,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा व प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ | रु. ३,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा, व प्रमाणपत्र |
| सांघिक विजेतेपद | रु. २,००१ - स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा आणि महाविद्यालयांसाठी स्वा. सावरकरांचे निवडक ग्रंथ व वीर सावरकर चित्रपट |
| सांघिक उपविजेतेपद | रु. १,००१ - स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा आणि महाविद्यालयांसाठी स्वा. सावरकरांचे निवडक ग्रंथ व वीर सावरकर चित्रपट |

**अधिक माहितीसाठी :**

पुणे : राहुल टोकेकर : मो. 98229 71079 | संतोष गोगले : मो. 92264 48481

मुंबई : अमेय देशपांडे : मो. 88888 03073 | यदुनाथ देशपांडे : मो. 93403 42698

प्रफुल्ल माणगावकर : मो. 99201 24256

**स्पर्धा स्थान :**

ॲम्फी थिएटर,
फर्ग्युसन महाविद्यालय,
शिवाजी नगर, पुणे - ४११००४

rmponweb.org | rmponweb.org | @rmponweb | rmponweb

## स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना पुढीलप्रमाणे पारितोषिक दिले जातील

### वैयक्तिक पारितोषिक

| | |
|---|---|
| प्रथम | रु. ११,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा व प्रमाणपत्र |
| द्वितीय | रु. ७,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा व प्रमाणपत्र |
| तृतीय | रु. ५,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा व प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ | रु. ३,००१ - ग्रंथ, वीर सावरकर चित्रपट, स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा व प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| सांघिक विजेतेपद | रु. २,००१ - स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा आणि महाविद्यालयांसाठी स्वा. सावरकरांचे निवडक ग्रंथ व वीर सावरकर चित्रपट |
| सांघिक उपविजेतेपद | रु. १,००१ - स्मृती चिन्ह, स्वा. सावरकर प्रतिमा आणि महाविद्यालयांसाठी स्वा. सावरकरांचे निवडक ग्रंथ व वीर सावरकर चित्रपट |

### अधिक माहितीसाठी :

**पुणे :** राहुल टोकेकर : मो. 98229 71079

संतोष गोगले : मो. 92264 48481

**मुंबई :** अमेय देशपांडे : मो. 88888 03073

यदुनाथ देशपांडे : मो. 93403 42698

प्रफुल्ल माणगावकर : मो. 99201 24256

आत्मदीपो भव!

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने

आज़ादी का अमृत महोत्सव



# स्वा. सावरकर स्मृती
# 'आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा'



## विषय :
## "भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहास लेखनात क्रांतिकारकांवर नेहमीच अन्याय होत गेला आहे"

**रविवार, दि. २५ सप्टेंबर २०२२**

**स्पर्धा स्थान :**
ॲम्फी थिएटर, फर्ग्युसन महाविद्यालय, शिवाजी नगर, पुणे - ४११००४

rmponweb.org | rmponweb.org | @rmponweb | rmponweb

## स्वा. सावरकर स्मृती
## "आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा"

### पार्श्वभूमी :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी गेली ४० वर्षे अविरतपणे प्रबोधन, प्रशिक्षण आणि संशोधन या क्षेत्रात कार्य करणारी एक स्वयंसेवी संस्था आहे. प्रबोधिनी द्वारा राजकीय कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्थेतील कर्मचारी, पदाधिकारी आणि सामाजिक तथा राजकीय क्षेत्रातील कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी क्षमता संवर्धनाचे विविध उपक्रम योजिले जातात.

महाविद्यालयीन क्षेत्रात विद्यार्थ्यांना देशाच्या प्रश्नांविषयी, इतिहासाविषयी जाण उत्पन्न करणे, त्यांची अध्ययन शक्ती व वक्तृत्वकलेस प्रोत्साहन देणे या उद्देशाने **रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी**, **सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे** यांच्या संयुक्त विद्यमाने वादविवाद स्पर्धेचे आयोजन करत असते.

यंदाही, स्वा. सावरकर स्मृती आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन **रविवार दि. २५ सप्टेंबर २०२२** रोजी आयोजित करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धेचे **१५** वे वर्ष आहे.

### स्पर्धेच्या विषयाबद्दल :

भारत आज स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहे. ७५ वर्षांपूर्वी देशाला जुलमी ब्रिटिश राजसत्तेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची बाजी लावली. भगतसिंह, राजगुरू, सुखदेव, स्वातंत्र्यवीर सावरकर असे या चळवळीतील बिनीचे शिलेदार इतिहासात ठळकपणे भेटतात. पण त्याखेरीज ज्या हजारो क्रांतिकारकांनी आपल्या बलिदानातून या स्वातंत्र्यपर्वाला आकार दिला, त्यातील अनेकजण आजही इतिहासाला अज्ञात आहेत. काहींचे निव्वळ नामोल्लेख आहेत तर काहींच्या आहुतीची पुसटशी नोंदही नाही. भारतीय इतिहासानं या समर्पणाची म्हणावी तशी दखल घेतली आहे का... ? की **भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहास लेखनात क्रांतिकारकांवर नेहमीच अन्याय होत गेला आहे...?** याबद्दल तुम्हाला काय वाटतं.. ?

ही आहे व्यक्त होण्याची अनोखी संधी...! भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधत याबाबत मंथन करूया स्वातंत्र्यवीर सावरकर आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून. आपली मते आणि विचार खंबीरपणे आणि मोकळेपणाने मांडा...आजच नोंदणी करा स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृती वादविवाद स्पर्धेसाठी...!

### नोंदणी :

- स्पर्धेस येणाऱ्या स्पर्धकांनी **शनिवार, दि. १७ सप्टेंबर २०२२** पर्यंत आपले नोंदणी अर्ज **Online** भरावे

### शुल्क :

- प्रत्येक संघासाठी, **रु. ५५०/-** शुल्क (वस्तू व सेवाकरासह) आकारण्यात येईल. (चहा, नाश्ता, भोजनासह)

- **UPI ID :** rmplekha@okaxis
- **GPay No.** 82917 56929
- शुल्क भरल्यावर अनिल पांचाळ मो. क्र. 99754 15922 या नंबरवर कळवावे.

### नियम व सूचना :

- ही आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयातील व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या पण २५ वर्षे वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.
- प्रत्येक महाविद्यालयाने या स्पर्धेसाठी दोन विद्यार्थ्यांचा एक संघ पाठवायचा असून एका सहभागीने विषयाच्या बाजूने तर दुसऱ्याने विषयाच्या विरुद्ध बाजूने मांडणी करावयाची आहे.
- स्पर्धेचे माध्यम मराठी आहे. स्पर्धकाला विषय मांडणी मराठीतच करावी लागेल.
- विषय मांडणीसाठी प्रत्येक स्पर्धकाला एकूण जास्तीत जास्त दहा मिनिटे वेळ देण्यात येईल. आठ मिनिटानंतर सावधानतेची सूचना दिली जाईल.
- स्पर्धा **रविवार, दि. २५ सप्टेंबर २०२२** रोजी होणार असून, ही स्पर्धा सकाळी ९.०० वाजता सुरु होईल व पारितोषिक वितरण समारंभाने स्पर्धेची सांगता होईल.
- स्पर्धकांबरोबर येणाऱ्या प्राध्यापक वा अन्य व्यक्तींसाठी भोजन शुल्क रु.१५०/- प्रत्येकी राहील.
- स्पर्धेविषयी अंतिम निर्णय आयोजकांकडे असतील.

Scan

Registration Link: https://iidl.org.in/savarkarspardha/